REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# निवडणूकांच्या वाढत्या खर्चाचे आव्हान

**डॉ. तुषार निकाळजे**

**प्रस्तावना :**

लोकशाही टिकविण्यासाठी सार्वजनिक निवडणुका हा संविधानीक मार्ग आहे. निवडणूकांची कार्यपध्दती पूर्ण करण्यासाठी होणारा खर्च अटळ आहे. या लेखात निवडणूकीकरिता आवश्यक असलेल्या खर्चांच्या माहितीची चर्चा केलेली आहे.



**प्रशासकीय उतरंड :**

निवडणुकीचे कामकाज पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय सेवक व अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. या प्रशासकीय यंत्रणेवरील खर्च हा अटळ आहे. निवडणूक आयुक्तांपासून शिपाई वर्गापर्यंत काम करणाऱ्या सर्व प्रशासकीय सेवकांना त्यांचे मानधन (काहींना प्रतिनियुक्ती असते तर काही कायम स्वरूपी) किंवा भत्ते, ज्यादा कामाचे मेहनताना दिला जातो. त्याचबरोबर मतदानाचे साहित्य, निवडणुकीचे कामाकरीता वापरण्यात येणारी शासकीय वाहने (एस.टी. बसेस, सुमो, जिप्स, मॅटेडॉर इत्यादी) यांचेवर देखील खर्च करावा लागतो. या सर्वांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे दिली आहे. प्रमाण एका विधानसभा मतदारसंघाचे आहे. त्यानुसार सहा विधानसभा मतदारसंघांचा एक लोकसभा मतदारसंघ असा निकष वापरण्यात आला आहे. यामध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (Presiding Officers) मतदान अधिकारी क्र.१, २, ३, राखीव कर्मचारी, क्षेत्रीय अधिकारी, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी, मतमोजणी सहाय्यक, मतमोजणी पर्यवेक्षक, शिपाई इत्यादींकरीता केलेल्या खर्चाची माहिती दिली आहे. यंदा २०१९ पासून व्हीव्हीपीटी मशिनचा व कागदाचा खर्च किती होाार आहे? हे वेग्हेच.

**मतदान यंत्रामुळे वेळेची, कागदांची व पैशाची बचत :**

मतदान यंत्रामुळे मतदानास लागणाऱ्या वेळेची बचत झाली आहे. पूर्वी मतपत्रिका मतदाराने स्वीकारलेपासून टेबलवर जावून फुलीचा शिक्का मारून त्याची घडी घालून मतपेटीत टाकण्याच्या पूर्ण प्रक्रियेस ३ ते ४ मिनीटे वेळ लागत होता. परंतु मतदान यंत्रामुळे ४५ सेकंद ते एक मिनीटांपेक्षा जास्त वेळ खर्च होत नाही. वाढत्या लोकसंख्येचा/मतदारांचा प्रश्न लक्षात घेता मतदान यंत्र उपयुक्त आहे. अन्यथा मतदान केंद्रांची संख्या वाढवावी लागेल, त्याचबरोबर प्रशासकीय अधिकारी, सेवक, आवश्यक मतपत्रिकेचा कागद यामध्ये वाढ करावी लागेल. म्हणून यंत्रामुळे बरीच बचत होत आहे.

मतदान यंत्रामुळे कागदाची बचत झाली आहे. महाराष्ट्रात ७.४ (साडेसात) लाख टन कागदाची बचत यापूर्वीच्या निवडणुकीत झाली आहे. महाराष्ट्रा ७,५०,००० टन कागदाची बचत म्हणजे एका लोकसभा मतदारसंघात १५,६२५ टन (७,५०,००० भागिले ४८ जागा) एवढ्या कागदाची बचत झाली आहे. संपूर्ण भारतात ८४,८४,३७५ टन (१५,३२५ टन ५४३ मतदारसंघ) कागदाची बचत झाली होती.

या व्यतिरिक्त सर्वात महत्वाची बाब म्हणजे मतदान यंत्रामुळे मतपेट्या पळविण्याचे गैरप्रकार थांबले. मतदान यंत्र तयार करण्यास एकाच वेळी खर्च करावा लागतो परंतु त्याचा उपयोग वर्षानुवर्षे करता येतो. तसेच ही मतदान यंत्रे विदेशातही निवडणुकीकरीता पाठविण्यात येतात. सन १९९६ मध्ये ८,००,००० मतदान केंद्रावर २५,२५,५९५ मतपेट्या होत्या. आता त्याही खर्चात यामुळे बचत झाली आहे. वाढत चाललेली भारताची लोकसंख्या व मतदारांची संख्या लक्षात घेता मतदानयंत्रे वापरणे हीच आजच्या निवडणूक यंत्रणेची गरज आहे. त्यामुळे कागदाचा खर्च, वेळ, मनुष्यबळाचा खर्च यांची मोठ्या प्रमाणावर बचत होते.

**२०१४ साली भारतातील लोकसभा निवडणुकीकरीता केलल्या प्रशासकीय खर्चाची माहिती :**

| अ.क्र. | तपशील | रक्कम रूपये (एका लोकसभा मतदारसंघाकरीता) | रक्कम रूपये (५४३ लोकसभा मतदारसंघाकरीता) |
|---|---|---|---|
| १. | निवडणुकीच्या कामाकरीता नेमलेल्या अधिकाऱ्यांचे, सेवकांचे मानधन, वेतन, भत्ते, ज्यादा कामाचा मेहनताना. | ५५,२७,४९९ | ३००,१४,३१,९५७ |
| २. | निवडणुकीच्या कामाकरीता वापरण्यात आलेल्या प्रशासकीय वाहनांचा पेट्रोल, डिझेलचा खर्च. | १५,७०,३१९ | ८५,२६,८३,२१७ |
| ३. | प्रशासकीय कामाकरीता वापरण्यात येणाऱ्या स्टेशनरी, छपाईचा खर्च. | १९,९४,३१९ | १०८,२९,१५,४५६ |
| ४. | भाडेतत्वावरील कार्यालयाची जागा मंडप यांचा खर्च | ४४,८५,७२२ | २४३,५७,४७,२६८ |
| ५. | निवडणुकीच्या प्रबोधनात्मक जाहिरातीचे (वर्तमानपत्र, दुरदर्शन, फलक इ.) खर्च | ९,५३,०७५ | ५१,७५,१९,९५६ |
| | **एकूण** | **१,४५,३०,९३४** | **७८९,०२,९७,८५४** |

खालील तक्ता पहाता निवडणुकीकरीता होणारा खर्च दिवसेंदिवस किती मोठ्या प्रमाणावर होत आहे हे लक्षात येईल.

**लोकसभेच्या निवडणुकीकरीता झालेला खर्च.**

| निवडणूक वर्ष | एकूण खर्च |
|---|---|
| १९५२ | १०,४५,००,००० |
| १९५७ | ५,९०,००,००० |
| १९६२ | ७,३२,००,००० |
| १९६७ | १०,७९,६९,००० |
| १९७१ | ११,६०,८७,४५० |
| १९७७ | २३,०३,६७,००० |
| १९८० | ५४,७७,३९,००० |
| १९८४ | ८१,५१,३५,००० |
| १९८९ | १५४,२२,००,००० |
| १९९१ | ३५९,१०,२४,६७१ |

| | |
|---|---|
| १९९६ | ५९७,३४,४१,००० |
| १९९८ | ६६६,२२,१६,००० |
| १९९९ | ८८०,००,००,००० |
| २००४ | १३००,००,००,००० |
| २००९ | १४८३,००,००,००० |
| २०१४ | ३४२६,००,००,००० |

या खर्चाबरोबरच निवडणुकीच्या राजकीय पक्ष, उमेदवार यांच्या निवडणूक खर्चावर देखील निवडणूक आयोगाचे लक्ष व नियंत्रण असते.

**लोकसभा निवडणुकीत जप्त झालेल्या अनामत रकमेची वर्षनिहाय माहिती :**

| निवडणूक वर्ष | अनामत रक्कम जप्त झालेल्या उमेदवारांची संख्या |
|---|---|
| १९५२ | ७४८ |
| १९५७ | ४६५ |
| १९६२ | ८५६ |
| १९६७ | १२०४ |
| १९७१ | १७०८ |
| १९७७ | १३५६ |
| १९८० | ३४१३ |
| १९८४ | ४२६३ |
| १९८९ | ५००३ |
| १९९१ | ७२१८ |
| १९९६ | १२६८८ |
| २००४ | ४२१८ |
| २००९ | ६८२९ |
| २०१४ | ८२५१ |

लोकसभा निवडणुकीकरीता जर एखादा व्यक्ती अर्ज भरू इच्छित असेल तर त्यास रू. १०,०००/- अनामत रक्कम भरावी लागते. मागासवर्गीय जाती-जमातीच्या उमेदवारास रू.५,०००/- अनामत रक्कम भरावी लागते. विधानसभा निवडणुकीस रू.५,०००/- व मागासवर्गीय जाती-जमातीच्या उमेदवारास रू. २५००,. अनामत रक्कम भरावी लागते. प्रत्येक लोकसभा निवडणुकीमध्ये साधारणतः दीड ते दोन कोटी रूपयांची अनामत रक्कम जप्त होत असते. ही सर्व रक्कम सरकारी तिजोरीमध्ये जमा केली जाते.

एका राज्यात लोकसभा निवडणुकीचे कामासाठी १,५२,००० मतदान यंत्रे आवश्यक असतात. एका यंत्राची किंमत अंदाजे रू.५,०००/- आहे. एकूण मतदानकेंद्रे ८२,२५५ व कर्मचाऱ्यांची संख्या सहा लाख असते. मतदारांची संख्या लक्षात घेता प्रतिमतदार रू.२०/- इतका खर्च करावा लागतो. परंतु सध्या वापरात असलेले इलेक्ट्रौनिक्स मतदान यंत्रामुळे फक्त महाराष्ट्रात साडेसात लाख टन कागदाची बचत झाली आहे.

**वाढते मतदार, पक्ष, उमेदवार, त्यानुसार वाढलेली निवडणूक प्रशासकीय यंत्रणा व त्यावरील खर्च :**

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशात आतापर्यंत १४ सर्वसाधारण निवडणुका आणि राज्य विधिमंडळासाठी ३५० निवडणुका झाल्या आहेत. संसदीय स्तरावर भारतात लोकसभेच्या ५४३ आणि राज्य विधिमंडळाच्या ४०६१ जागा आहेत. १९९९ सालच्या सर्वसाधारण निवडणुकीवेळी एकूण मतदारांची संख्या ६१९.५ दशलक्ष होती. त्यात २९५.७ दशलक्ष महिला होत्या. बाह्य दिल्ली मतदारसंघात त्यावेळी सर्वाधिक ३११ दशलक्ष तर आकाराने सर्वात लहान लक्षद्वीप मतदारसंघात सर्वात कमी ३७ हजार मतदार होते.

मतदारांची प्रचंड संख्या, कितीही चांगले अधिकारी असले तरी, निवडणुकीचे व्यवस्थापन करताना त्यांच्या मनात धडकी भरते. भारतातील मतदारांची एकूण संख्या अनेक देशांच्या एकत्रित एकूण लोकसंख्येच्याही पलीकडे जाणारी असली तरी निवडणूक प्रक्रिया नेहमी कायद्यानुसार आणि बहुतांशी शांततेतच पार पडली आहे. अनेक दशकांचा निवडणुकीचा अनुभव, प्रक्रियांची कठोरपणे नोंदणी आणि अंमलबजावणी, निवडणूक कर्मचाऱ्यांचे योग्य प्रशिक्षण आणि मुक्त आणि निःपक्ष वातावरणात निवडणुका पार पाडण्याची घटनात्मक जबाबदारी असलेल्या भारतीय निवडणूक आयोगाच्या दक्ष नियंत्रणातून हे शक्य झाले आहे.

मतदारांना लांब प्रवास करून मतदानाला जावे लागू नये म्हणून मतदान केंद्र शक्य तेवढ्या वस्त्यांच्या जवळ राखण्याची काळजी घेतली जाते. एकदम गर्दी होऊन मतदारांना खूपवेळ रांगेत उभे रहावे लागू नये, यासाठी एका मतदार केंद्रावर व्यवस्थापन करण्याजोगी मतदान संख्या राखली जाते. १९९९ सालच्या सर्वसाधारण निवडणुकीसाठी मतदान केंद्राची एकूण संख्या ७,७४,६५१ होती. कोणतेही मतदान केंद्र निश्चित करताना त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि इतर आवश्यक साहित्यांची व्यवस्था करावी लागते. त्याखेरीज इतर मतदान साहित्य त्या केंद्रावर वेळेवर पोहोचेल याचीही निश्चिती करावी लागते. मतदानाकरिता प्रत्येक मतदान केंद्रावर सर्वसाधारणपणे पाचजणांची व्यवस्था करावी लागते. मतदानपत्रिका, मतपेट्या, खोडली न जाणारी शाई आणि इतर साहित्य प्रत्येक मतदान केंद्रावर जाणाऱ्या साहित्यामध्ये समाविष्ट असते.

प्रत्येक मतदान केंद्रावर सरासरी मतदार संख्या १०००-१२०० ठेवली जाते. पण या सरासरी आकड्यामुळे अल्प लोकसंख्या घनता असलेल्या भागात अत्यंत कमी लोकांसाठीही मतदान केंद्र स्थापन करावे लागण्याची शक्यता नाकारली जात नाही.

भारतीय मतदारांसमोरील निवडीचा पर्यायही सहजसोपा नाही. १९९९ मधील निवडणुकीत सात राष्ट्रीय पक्ष, ४० राज्यस्तरीय पक्ष आणि १२२ नोंदणीकृत (अमान्यताप्राप्त) पक्षाखेरीज असंख्य अपक्ष उमेदवार रिंगणात उतरले होते. ५४३ मतदारसंघात एकूण ४६८८ उमेदवार निवडणुकीला उभे होते. उत्तर प्रदेशातील एका मतदारसंघात सर्वाधित ३२ उमेदवार एकमेकांसमोर प्रतिस्पर्धी म्हणून उभे ठाकले होते. या संदर्भात काही निवडणुक सुधारणा झाल्यानंतर आता परिस्थिती बदलली आहे. १९९६ च्या निवडणुकीत आंध्रप्रदेशातील नालगोंडा मतदारसंघात ४८० उमेदवार रिंगणात होते. त्यामुळे साहजिकच मतपत्रिकांना वृत्तपत्रांचे किंवा पुस्तकाचे स्वरूप लाभले होते. १९९६ मध्ये ८००० मेट्रीक टन कागद मतपत्रिका छापण्यासाठी वापरण्यात आला होता.

निवडणुकीचे व्यवस्थापन करण्याच्या या महाकाय प्रक्रियेत शासकीय खात्यांमधील जवळपास पाच दशलक्ष कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे साहाय्य घेतले जाते. वेगवेगळ्या मंत्रालयांकडून हे अधिकारी कर्मचारी आलेले असले तरी निवडणूक कर्तव्यावर असताना त्यांच्यावर निवडणूक आयोगाचे प्रशासकीय नियंत्रण असते. १९९९ सालच्या सर्वसाधारण निवडणुकीवर शासनाचे ८,८०० दशलक्ष रूपये खर्च झाले होते.

वर्ष २००९ पासून मतदान यंत्राचे वेगळे राजकारण सुरू झाले. निवडणुक हरलेले पक्ष व उमेदवार निवडणुक जिंकलेल्या पक्ष व उमेदवारांवर मतदान यंत्राच्या घोटाळ्याचं राजकारण करून हल्ला करीत आहेत. त्यामुळे अप्रत्यक्षरित्या निवडणुक आयोगच अडचणीत येत आहे. परंतु यावर निवडणुक आयोगाने वेगवेगळ्या उपाययोजना केल्या आहेत. उदा. मतदान यंत्रावरील मतदान तपासण्यासाठी Voter verified Paper Audit-Trail (VVPAT) एक छोटे मशिन सुरू केले आहे.

वरील परिस्थिती पाहता दिवसेंदिवस वाढणाऱ्या लोकसंख्येबरोबरच निवडणूकांचा वाढणारा खर्च हे आपल्या देशासमोरील एक आर्थिक आव्हानच आहे.

**संदर्भ :**


१. माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये पर्वती मतदार संघाची (पुणे) मागविलेली निवडणूक खर्चाची माहिती दि. २८/०९/२०१०.

२. www.eci.in/Misc states/Expenditure Lok-Sabha htm. Page No.1

३. Election Manual : chapter III : Page 28.

४. राहुल गडपाले : सकाळ : १४ सप्टेंबर २००९.

५. मृणालिनी नानिवडेकर : सकाळ : ४ मार्च २००९.

६. लोकमप्रतिनिधीत्व कायदा १९५१.


LBP PUBLICATION